**' प्रेस नोट '**

**दिनांक ०६/११/२०२५**

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्रीमती ममता संजय पाटील, वय ५० वर्षे, पद— वरिष्ठ लिपीक वर्ग — ३, आस्थापना विभाग, पोलीस अधीक्षक, कार्यालय अकोला ह.मु.गिता नगर, तीन बंगला जवळ, तोळकर यांच्या घरी भाडयाने अकोला, मुळ पत्ता — रूंदावन नगर, चिखली रोड, बुलडाणा. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/— रु. |
| तडजोडी अंती पहीला टप्पा स्विकारण्याचे मान्य केलेली लाचेची रक्कम | ८,०००/— रु. |
| घटनास्थळ | पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला येथील आस्थापना विभागाला लागुन असलेल्या जिन्याजवळ. |
| घटना ता. व वेळ | दि. ०६/११/२०२५ चे १८/२९ ते १८.४० वा. चे सुमारास. |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार हे धान्ये खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांचे कडे कमिशन बेसवर काम करणारा कैलास ओमप्रकाश अग्रवाल यांनी माहे ऑक्टोंबर २०२३ मध्ये तक्रारदार यांच्या अनुमती शिवाय त्यांच्या वेअर हाउस मधील धान्य विकुन तक्रारदाराची फसवणूक केली. त्यावरून पोस्टे रामदास पेठ, अकोला येथे फसवणूकीचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस स्टेशन रामदास पेठ तसेच गुन्हे शाखा अकोला यांचेकडे असुन सदर गुन्हयात तपासी अधिका—यांनी आरोपी कैलास अग्रवाल यांना मदत केल्यामुळे त्यांना जामीन मिळाला. असे तक्रारदाराचे म्हणने आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी सदर गुन्हयातील तपासी अधिकारी यांनी आरोपीस मदत केली म्हणुन त्यांना जामीन मिळाला आहे. करीता सदर अधिका—यांवर फौजदारी कार्यवाही करण्यात यावी. अशा आशयाचा तक्रार अर्ज पोलीस अधीक्षक, कार्यालय अकोला येथे दिला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांचे आदेशावरुन मा. अपर पोलीस अधीक्षक अकोला यांनी चौकशी करुन अहवाल मा. पोलीस अधीक्षक, कार्यालय अकोला येथे पाठविला आहे. सदर अहवालावर नोटशीट तयार करुन वरिष्ठांना सादर करण्यासाठी वरिष्ठ लिपीक श्रीमती ममता संजय पाटील, नेमणुक आस्थापना विभाग, पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला यांनी तक्रारदार यांना २०,०००/— रुपये मागणी करुन नोटशीट पुटअप करण्यापुर्वी १०,०००/— रु व नोटशीट पुटअप केल्यावर १००००/— रु दयावे लागतील अशी लाचेची मागणी करित असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती कार्यालय येथे प्राप्त झाली. सदर तक्रारीवर कारवाई करण्यासाठी वरिष्ठांनी आदेश दिल्यावरुन आज दिनांक ०६/११/२०२५ रोजी पडताळणी कारवाई आजमावली असता पडताळणी कारवाई दरम्यान 'तक्रारदार यांच्या अर्जावरुन मा. अपर पोलीस अधीक्षक, अकोला यांनी जो अहवाल मा. पोलीस अधीक्षक, कार्यालय अकोला येथे पाठविला आहे सदर अहवालावर नोटशिट पुटअप करण्यापुर्वी लोकसेवक श्रीमती ममता संजय पाटील, वरीष्ठ लिपीक, यांनी तक्रारदार यांना तडजोडीअंती ८,०००/— रु लाचेची मागणी करुन स्विकारल्याचे मान्य केल्याने लागलिच आजमाविण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष सदर लाच स्विकारल्या वरुन आज रोजी लोकसेवक श्रीमती ममता संजय पाटील, वरिष्ठ लिपीक यांना ताब्यात घेण्यात आले असुन लोकसेवका विरुदध पो.स्टे. खदान, अकोला येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे. **सदरची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती चे मा.पोलीस अधीक्षक, श्री मारुती जगताप, मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री सचिन्द्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक श्री सुनिल किनगे, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्रीमती चित्रा मेसरे, सोबत पोलीस निरीक्षक, ज्ञानोबा फड, पोलीस हवालदार राहुल वंजारी, प्रमोद रायपुरे, पोकॉ. शैलेश कडू, चालक पोउपनि. सतिश किदुकले यांनी यशस्वीरित्या पार पाडली.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क:** १)मा. श्री मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मो.क्र. ९८५०४८८७८८.

२) श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, मो.क्र. ९७६४२१०४८५.

३) श्री सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक मो.क्र. ९८२३११११५५.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, ललील सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

**टोल फ्री कमांक — १०६४,०७२१—२५५२३५५, मो.नं. ७५८८७५१०६४.**

(पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ... stamp)

(चित्रा कि. मेसरे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. अमरावती घटक